# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ४९८/२०१९**

**तक्रारकर्ता श्री. रेग्गी पीटर डायस**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का)**

बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त एच/पूर्व विभाग यांचे कार्यालय,
१३७ टीपीएस- ५, दुसरा मजला, प्रभात कॉलनी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई- ४०००५५.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहा. आयुक्त**

बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त एच/पूर्व विभाग यांचे कार्यालय,
१३७ टीपीएस- ५, दुसरा मजला, प्रभात कॉलनी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई- ४०००५५.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २४.०२.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मु.मा.आ.नों.क्र. २२३४/२०१८ रा.मा.आ. अपील क्र. ८१३/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. १६.१०.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, इमारत व कारखाने, एच ईस्ट यांनी अपिलार्थीना उपलब्ध माहिती १५ दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये निशुल्क पुरवावी. या आदेशासह अपील निकाली काढण्यात येत आहे."*

उक्त आदेशाप्रमाणे माहिती मिळाली नाही, म्हणून अपिलार्थी यांनी दिनांक २७.११.२०१९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये आयोगाकडे तक्रार दाखल केली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने आयोगाने जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ०७.०१.२०२० रोजी अहवाल मागविला. जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०५.०१.२०२१ रोजी आयोगास अहवाल सादर केला आहे. सदर अहवालात जन माहिती अधिकारी यांनी असे नमूद केले आहे की, दिनांक ०२.०१.२०२१ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ते यांना कळविले आहे की, मुद्दा क्रमांक अे शी संबंधीत माहिती सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. मुद्दा क्रमांक बी, सी डी, व डी ही बाब सहाय्यक करनिर्धारक व संकलक, एच/पूर्व विभाग यांचेशी संबंधीत आहे.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक एच/पूर्व यांनी त्यांचा अहवाल दिनांक ३०.१२.२०२० आयोगास सादर केला. तो अभिलेखावर घेण्यात आला.

..२/-

अर्जाच्या सुनावणी तक्रारकर्ते व जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) एच/पूर्व विभाग हे उपस्थित होते. तक्रारकर्ते यांनी आयोगास नमूद केले की, त्यांना माहिती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २०.०२.२०२५ चे तक्रारकर्त्यांना लिहिलेले पत्र आयोगास सादर करुन नमुद केले की, तक्रारकर्त्यांनी मागीतलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही या कारणामुळे माहिती देता येत नाही.

आयोगाच्या अभिलेखावरुन निदर्शनास येते की, तक्रारकर्ता यांनी सदर माहिती अर्ज कर निर्धारक व संकलक यांच्या कार्यालयात सादर केला होता व संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि. १४.०२.२०१८ नुसार सदर माहिती अर्ज जन माहिती अधिकारी, इमारत व कारखाना एच/ पूर्व विभाग यांच्याकडे हस्तांतरीत करुन अपिलार्थी यांना तसे कळविले. यांचे आधारे राज्य माहिती आयोगाने दि. १६.१०.२०१९ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, (इ व का), एच/ईस्ट विभाग यांनी अपिलार्थी यांना १५ दिवसांत निशुल्क माहिती पुरवावी, असे आदेशित केले होते. परंतु आता जन माहिती अधिकारी (इ. व का.) एच/पूर्व विभाग यांनी त्यांचे दि. २०.०२.२०२५ चे पत्रान्वये तक्रारकर्ते यांना कळविले आहे की, त्यांच्याकडे माहिती उपलब्ध नाही.

सदर प्रकरणी असे निदर्शनास येते की, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक, एच/पूर्व विभाग हे तक्रारकर्ते यांना कळवितात की, संबंधीत माहिती जन माहिती अधिकारी (इ व का) एच/ईस्ट विभाग यांच्याशी संबंधित आहे व जन माहिती अधिकारी (इ व का) हे अपिलार्थी यांना कळवितात की, सदर माहिती सहाय्यक करनिर्धारक व संकलक, एच/पूर्व विभाग यांचेशी संबंधीत आहे.

या कारणामुळे कोणतेही आदेश पारित करण्यापूर्वी जन माहिती अधिकारी (इ व का) एच/ईस्ट विभाग व जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक, एच/पूर्व विभाग यांची उपस्थिती आवश्यक आहे.

## आदेश

**सदर प्रकरणी दिनांक २१.०३.२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. जन माहिती अधिकारी (इ व का) एच/ईस्ट विभाग व जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक, एच/पूर्व विभाग यांनी सुनावणीस उपस्थित रहावे.**

27-2-2025

**मुंबई**
**दिनांक : २७.०२.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

State Information Commission

प्रत:- जन माहिती अधिकारी करनिर्धारक व संकलक, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई

## रामाआ- तक्रार क्र. बीएम- ४९८/२०१९
## तक्रारकर्ता श्री. रेग्गी पीटर डायस

**सुनावणी दिनांक : २१.०३.२०२५ (In continuation of order dt २७.०२.२०२५)**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १०.०३.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी आयोगाने जन माहिती अधिकारी (इ व का) एच/ईस्ट विभाग व जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक, एच/पूर्व विभाग यांनी पुढील सुनावणीस उपस्थित रहावे असे आदेशित केले होते.

आजच्या सुनावणी वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी (इ व का) एच/ईस्ट विभाग अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक, एच/पूर्व विभाग उपस्थित असून त्यांनी दि. १८.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये तक्रारकर्ता यांना माहिती पाठविलेली आहे. परंतु, असे दिसून येते की, पाठविलेली माहिती व मागितलेली माहिती विसंगत आहे. आयोगाच्या अभिलेखवरील माहितीचा अर्ज दि. २२.०१.२०१८ तसेच आयोगाचे आदेश दि. १६.१०.२०१९ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक, एच/पूर्व विभाग यांना उपलब्ध करून देण्यात आले. त्याआधारे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक, एच/पूर्व विभाग यांनी त्याच्या अनुपालन अहवालासह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक, एच/पूर्व विभाग यांनी असेही सादर केले की, सदर माहिती जन माहिती अधिकारी (इ व का) एच/ईस्ट विभाग या कार्यालयाशी संबंधीत आहे.

जन माहिती अधिकारी (इ व का) एच/ईस्ट विभाग यांनीही पुढील सुनावणीच्या वेळी उपस्थित रहावे.

### आदेश

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २३.०४.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

**मुंबई**
**दिनांक : २४.०३.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

प्रत:- जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई

निर्गमित
दिनांक 03 APR 2025

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ४९८/२०१९**
**तक्रारकर्ता श्री. रेग्गी पीटर डायस**
**सुनावणी दिनांक : २३.०४.२०२५ (In continuation of order dt २४.०३.२०२५)**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी आयोगाच्या अभिलेखावरील माहितीचा अर्ज दि.२२.०१.२०१८ तसेच आयोगाचे आदेश दि. १६.१०.२०१९ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक, एच/पूर्व विभाग यांना उपलब्ध करुन देण्यात आली. त्याआधारे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक, एच/पूर्व विभाग यांनी त्यांच्या अनुपालन अहवालासह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे. जन माहिती अधिकारी (इ व का) एच/ईस्ट विभाग यांनीही पुढील सुनावणीच्या वेळी उपस्थित रहावे असे आदेशित केले होते.

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित असून तक्रारकर्ता यांनी असे नमुद केले की, त्यांना माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती मिळालेली नाही.

जन माहिती अधिकारी (इ व का) एच/ईस्ट विभाग यांनी तक्रारकर्त्यास माहिती देण्यासाठी आणखी कालावधीची मागणी केली कारण की, माहिती संकलित करावा लागणार आहे. जन माहिती अधिकारी (इ व का) एच/ईस्ट विभाग यांनी आयोगाच्या तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे तक्रारकर्ता यांनी विचारलेली माहिती अर्जातील माहिती तक्रारकर्ता यांना पाठविण्यात यावी व अनुपालन अहवालासह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १६.०५.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

**मुंबई**
**दिनांक : २४.०४.२०२५**

State Information Commission Greater Mumbai

(डॉ. प्रदीप व्यास)
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

४८

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ४९८/२०१९**

**तक्रारकर्ता श्री. रेग्गी पीटर डायस**

**सुनावणी दिनांक : १६.०५.२०२५ (In continuation of order dt २४.०४.२०२५)**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टनुसार दि. २९.०४.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झालेली आहे.) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टनुसार दि. २९.०४.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झालेली आहे.) |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी (इ व का) एच/ईस्ट विभाग यांनी तक्रारकर्त्यास माहिती देण्यासाठी आणखी कालावधीची मागणी केली कारण की, माहिती संकलित करावा लागणार आहे. जन माहिती अधिकारी (इ व का) एच/ईस्ट विभाग यांनी आयोगाच्या तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे तक्रारकर्ता यांनी विचारलेली माहिती अर्जातील माहिती तक्रारकर्ता यांना पाठविण्यात यावी व अनुपालन अहवालासह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे असे आयोगाने आदेशित केले होते.

आजच्या सुनावणी वेळी तक्रारकर्ता उपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी (इ व का) एच/ईस्ट विभाग यांना ट्रॅकिंग रिपोर्टनुसार दि. २९.०४.२०२५ रोजी सुनावणी नोटीस प्राप्त झालेली असून ते कोणतीही पूर्वसुचना न देता अनुपस्थित आहेत. तसेच आयोगाच्या आदेशाप्रमाणे त्यांनी कोणताही अनुपालन अहवाल आयोगाच्या कार्यालयास सादर केलेला नाही.

जन माहिती अधिकारी (इ व का) एच/ईस्ट विभाग यांनी आयोगाच्या तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे तक्रारकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. यावरुन स्पष्ट होते जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियमाचे तरतूदीचे उल्लंघन केलेले आहे. या कारणामुळे जन माहिती अधिकारी (इ व का) एच/ईस्ट विभाग यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये शास्तीची कारवाई कायम करण्यात येत आहे.

तक्रारकर्ता यांनी आयोगास सादर केले की, त्यांनी माहिती प्राप्त करण्याकरिता वारंवार सुनावणीस उपस्थित रहावे लागले. तरी त्यांना माहिती मिळालेली नाही. तक्रारकर्ता यांना त्यांना झालेले मानसिक व शारिरीक त्रासापोटी व प्रवास खर्चापोटी नुकसान भरपाई देण्याची मागणी केली. तक्रारकर्ता यांची मागणी मान्य करण्यात येत आहे.

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) या प्रकरणातील वस्तुस्थिती व परिस्थिती लक्षात घेता, या प्रकरणात, श्री. राजू दौलत वाडिले, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) एच/पूर्व विभाग, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई- ५५ यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये रु. २५,०००/- (पंचवीस हजार फक्त) एवढी शास्ती करण्यात येत आहे.**

..२/-

सदरची शास्ती त्यांच्या मासिक वेतनातून पाच समान हप्त्यात वसूल करण्यात यावी व शासन परिपत्रक सा.प्र.वि. दिनांक ०९.०५.२००७ व शासन सा.प्र.वि. शुध्दिपत्रक दिनांक २८.०५.२००७ मध्ये नमूद केलेल्या पुढील लेखाशीर्षाखाली जमा करावी.

००७०-इतर प्रशासनिक सेवा
६० इतर सेवा, ८०० इतर जमा रकमा
(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१).

शास्तीचा भरणा विहित मुदतीत करून विभाग प्रमुख, विभागीय कार्यकारी अभियंता, एच/पूर्व विभाग, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई- ५५ यांनी आदेश प्राप्त झाल्यापासून दोन महिन्यांचे आत प्रथम शास्ती वसुलीबाबतचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा व त्यानंतर अंतिम वसुलीचा अहवाल सादर करावा.

२) जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना माहिती दिलेली नसल्याचे दिसून येत असल्यामुळे तक्रारकर्ता यांना मानसिक व शारिरीक त्रास झाला. तसेच प्रवास खर्चही झाला. या कारणामुळे तक्रारकर्ता यांची नुकसान भरपाईची मागणी मान्य करुन रु. २०००/- (दोन हजार रुपये) नुकसान भरपाई माहितीचा अधिकार अधिनियमचे कलम १९(८)(ख) अंतर्गत मान्य करण्यात येत आहे. श्री. राजू दौलत वाडिले यांनी वैयक्तिक खात्यातून तक्रारकर्ता यांना ३० दिवसांत नुकसान भरपाई अदा करावी व त्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करावा.

३) या आदेशासह तक्रार अंतिमतः निकाली काढण्यात येत आहे.

State Information Commission Greater Mumbai

प्रदीप व्यास 23-5-2025

मुंबई
दिनांक : २३.०५.२०२५

(डॉ. प्रदीप व्यास)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

प्रत: विभाग प्रमुख, विभागीय कार्यकारी अभियंता, एच/पूर्व विभाग, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई- ५५